# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

### प्रेस नोट

दिनांक 16/08/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील टाकळी भन्साळी येथे दिनांक 13/08/2021 चे 13.30 वा. ते दिनांक 14/08/2021 चे 17.15 वा. सुमारास फिर्यादी नामे– अरविंद्र प्रल्हाद अलोने, वय 42 वर्ष, रा. वार्ड क्र 1 टाकळी भन्साळी ता.सावनेर यांचे घरी कोणीही हजर नसंताना समोरील खोलीचे दाराचे आज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घराचे समोरील खोलीमध्ये ठेवलेल्या गोदरेजच्या लोखंडी कपाटातुन सोन्या–चांदीचे दागिने असा एकुण 26,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कृष्णा जुनघरे 9284890174 हे करीत आहे.

### जबर दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील तहसिल कार्यालय मेन गेट समोर काटोल येथे दिनांक 15/08/2021 चे 16.45 वा. चे 17.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– आकाश महेंद्रसिंग कुशवाह, वय 20 वर्ष, रा. शारदा चौक, काटोल व त्याचा भाउ नामे– सावन महेंद्रसिंग कुशवाह, वय 23 वर्ष हे चायनिजचे दुकान चालवितात. फिर्यादी व त्याचा भाउ हे दुकानात माल घेण्याकरीता गाडी घेवुन गेले असता आरोपी क्र. 1) शुभम जितेन्द्र रंगारी, वय 24 वर्ष, रा. हत्तीखाना काटोल व त्याचा भाउ आरोपी क्र. 2) राहुल रा. काटोल यांनी त्यांची गाडी थांबवुन त्यांच्यामध्ये फिर्यादीचे चायनिजचे दुकानाचे नास्ताचे पैसे न दिल्याचे कारणावरून वादविवाद झाला. यानंतर आरोपीतांनी फिर्यादी व त्याच्या भावाला लाठी व दगडाने डोक्यावर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचा भाउ सावन कुशवाह याला डोक्याला गंभीर मार असल्याने त्याला नागपुरला रेफर केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री दिनेश खोटेले हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर